# महाराष्ट्र शासन

"डिजीटाईज्ड कालबद्ध सेवा वर्ष २०१५"

क्रमांक :- जलशि २०१५/प्र.क्र.५१/जल-७,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ११ मे, २०१५

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण)
मुख्य अभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर
सर्व अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण)
सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण)
सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी.

विषय :- जलयुक्त शिवार अंतर्गत विशेष निधीमधुन करण्यात येत असलेल्या कामांच्या निविदा शर्ती संदर्भात.

संदर्भ :- १) शासन निर्णय, क्र.जलशि २०१४/प्र.क्र.२०३/जल ७, दि.५/१२/२०१४
२) समक्रमांक दिनांक ३/१/२०१५
३) शासन पत्र क्रमांक जलशि २०१५/प्र.क्र.३४/जल-७, दि.२६/२/२०१५
४) शासन पत्र क्र. जसअ-२०१५/प्र.क्र. ७१/जल-७, दि. २४ मार्च, २०१५.

कृपया उपरोक्त संदर्भित पत्रे पहावीत.

२. जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमा अंतर्गत जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातुन उपलब्ध करून देण्यात आलेल्या विशेष निधीमधुन मार्च २०१६ अखेरपर्यंत टंचाईमुक्त करण्यासाठी निवडण्यात आलेल्या गावांमध्ये जून २०१५ अखेरपर्यंत जलसंधारणाचे उपचार करण्यासाठी (साखळी सिमेंट नाला बांध व अन्य कामे) निविदा प्रक्रिया कार्यान्वीत करण्यात आलेली असून या संदर्भात राज्यभरात काढण्यात येणाऱ्या निविदांमध्ये एकसुत्रता रहावी या उद्देशाने मुख्य अभियंता लघु सिंचन जलसंधारण यांचेकडुन प्रारूप टेन्डर डॉक्यमेंन्ट करण्यात आले असुन त्यास मुख्य अभियंता यांनी

मान्यता दिलेली आहे. त्यानुसार राज्यभरामध्ये निविदा प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. या संदर्भात विदर्भ व नाशिक विभागातुन प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने एका ठेकेदारास केवळ दोन क्लस्टरची कामे घेता येतील ही अट शिथील करण्यास शासन स्तरावरून यापुर्वीच मान्यता देण्यात आली आहे. टेंडर डॉक्युमेंटमध्ये ठेकेदारांच्या सक्षमतेबाबत नमूद करण्यात आलेल्या अटी शिथिल करुन मिळण्याबाबतचा मुद्दा मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्या दि. ६ मे २०१५ रोजी झालेल्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये काही जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थित केलेला होता.Tender Document मधील तांत्रिक बाबी व ठेकेदारांची सक्षमता याबाबत मुख्य अभियंता ( पुणे व नागपुर) यांनी Tender Document चे प्रारुप मंजुर केलेले असल्याने त्यामध्ये काही शिथीलता दयावयाची असल्यास त्यांनी देणे अपेक्षित आहे. तथापी यामध्ये कालपव्यय होऊन विलंब होऊ नये याकरीता अटी शिथील करण्याबाबतचे अधिकार जिल्हा समितीला द्यावेत अशी मागणी करण्यात आलेली होती. या समितीमध्ये अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) यांचा समावेश केलेला आहे.

२. या संदर्भात असे निदेश देण्यात येत आहेत की, जून २०१५ अखेरपर्यंत कामे पूर्ण करुन आगामी पावसाळ्यात जलसंधारणाच्या बांधकामांमध्ये पाणी साठा होण्याकरिता वर नमूद कंत्राटदारांच्या सक्षमतेसंदर्भातील अटींमुळे ज्या ज्या ठिकाणी निविदेला नगण्य अथवा अल्प प्रतिसाद मिळत आहे त्या त्या ठिकाणाकरिता संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या समितीने निविदेतील सदर अटी आवश्यकतेनुसार शिथिल करण्याबाबत योग्य ती कारणमिमांसा देऊन त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्यास हरकत नसावी, यासंदर्भात शासनाकडे संदर्भ करण्याची आवश्यकता नाही. मात्र असे करीत असताना निविदेच्या मूळ गाभ्यात फरक पडणार नाही याबाबतची संपूर्ण दक्षता समितीने घ्यावयाची आहे.

३. याशिवाय जेथे एकच निविदा प्राप्त झाली असेल, त्या ठिकाणी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम संहितामधील तरतुदी लक्षात घेऊन क्षेत्रिय कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) यांनी जिल्हास्तरीय समितीस अभिप्राय दयावेत.जिल्हा समितीने याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

(प्रभाकर देशमुख)
सचिव (जलसंधारण)

Sent mail
११।५।१५

D:\jalyukta.docx